राज्यातील जिल्हाधिकारी व अपर जिल्हाधिकारी यांच्यातील तसेच निवासी उपजिल्हाधिकारी व उपजिल्हाधिकारी (महसूल) यांचे मधील कामाचे फेरवाटप करणेबाबत...

# महाराष्ट्र शासन

## महसूल व वन विभाग

**क्रमांक : संकिर्ण-२०२५/प्र.क्र.२७१/आस्था-०१ (ई-१४९४८३७)**

मंत्रालय मुख्य इमारत,मादाम कामा मार्ग,
हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई-४०० ०३२
दिनांक- ३१ जुलै, २०२६

वाचा: -

१. शासन परिपत्रक, महसूल व वन विभाग क्र. संकीर्ण ०२/२०११/प्र.क्र.१३/ई-१, दि.२९.०३.२०१२
२. शासन परिपत्रक, महसूल व वन विभाग क्र. संकीर्ण ०२/२०१२/प्र.क्र.४३/ई-१, दि.२८.१२.२०१२
३. शासन परिपत्रक, महसूल व वन विभाग क्र.संकीर्ण-०२/२०१२/प्र.क्र.४३/ई-१, दि.०४/१०/२०१३.
४. शासन परिपत्रक, महसूल व वन विभाग क्र.संकीर्ण २०१४/०५/प्र.क्र.६९/ई-१, दि.०२.०६.२०१४.
५. शासन परिपत्रक, महसूल व वन विभाग क्र.संकीर्ण-२०१५/प्र.क्र.२८/ई-१अ, दि.२४/०४/२०१७.
६. शासन निर्णय महसूल व वन विभाग क्र.कार्यशा-२०२५/प्र.क्र.०६/म-८ दि.०९/०४/२०२५.
७. समक्रमांक दिनांक ०३.०७.२०२६ रोजीचा शासन निर्णय.

**प्रस्तावना :-**

महसूल व वन विभागाचे विविध शासन निर्णय व शासन परिपत्रकांन्वये जिल्हाधिकारी व अपर जिल्हाधिकारी यांच्यामधील अधिकार व कामकाजाचे विषयांचे वाटप निश्चित करण्यात आलेले आहे. प्रशासकीय कार्यपद्धतीत झालेल्या कालानुरूप बदलांचा विचार करून सदर विषयांचे पुनर्विलोकन करून सुधारित व सुसंगत वाटप निश्चित करण्याबाबत विभागीय आयुक्त, नाशिक विभाग, नाशिक यांनी अहवाल सादर केला आहे.

दिनांक ४ व ५ एप्रिल २०२५ रोजी पुणे येथे आयोजित दोन दिवसीय कार्यशाळेत मा. मुख्यमंत्री यांनी दिलेल्या निर्देशानुसार, प्रशासन अधिक लोकाभिमुख, पारदर्शक व कार्यक्षम करण्याच्या दृष्टीने प्रशासनाच्या कार्यपद्धती व संरचनेत सुधारणा सुचविण्यासाठी प्रत्येक विभागीय आयुक्तांच्या अध्यक्षतेखाली विषयनिहाय सहा अभ्यास समित्या गठीत करण्याबाबत निर्देशित करण्यात आले. त्यानुसार महसूल व वन विभागाच्या संदर्भाधिन क्र.६ येथील शासन निर्णयान्वये सदर समित्यांची

स्थापना करण्यात आली. या अनुषंगाने विभागीय आयुक्त, नाशिक विभाग, नाशिक यांनी शासनास सादर केलेल्या अहवालातील परिशिष्ट-१९ व परिशिष्ट-२० मध्ये जिल्हाधिकारी व अपर जिल्हाधिकारी तसेच निवासी उपजिल्हाधिकारी व उपजिल्हाधिकारी (महसूल) यांच्यामधील अधिकार व कामकाजाचे वाटप याबाबत काही बदल व दुरुस्त्या सुचविलेल्या आहेत.

सध्याच्या प्रशासकीय गरजा, कामकाजातील वाढलेली गुंतागुंत व जबाबदाऱ्यांचा विचार करता जिल्हाधिकारी व अपर जिल्हाधिकारी यांचेकडील विषयांचे फेरवाटप प्रस्तावित करण्यात आले आहे. तसेच, निवासी उपजिल्हाधिकारी व उपजिल्हाधिकारी (महसूल) यांच्यातील कामकाजाचे स्पष्ट वाटप अद्याप शासन निर्णयाद्वारे निश्चित करण्यात आलेले नसल्याने राज्यातील सहा महसूल विभागांतील जिल्हाधिकारी कार्यालयांमध्ये विषयांच्या वाटपात भिन्नता आढळून येत आहे. प्रशासनात एकसंधता, सुसूत्रता व स्पष्ट जबाबदारी निश्चित होण्याच्या दृष्टीने जिल्हाधिकारी व अपर जिल्हाधिकारी तसेच निवासी उपजिल्हाधिकारी व उपजिल्हाधिकारी (महसूल) यांच्यामधील विषयांचे वाटप दिनांक ०३.०७.२०२६ रोजीच्या शासन निर्णयान्वये करण्यात आले होते.

त्याअनुषंगाने, विभागीय आयुक्त यांच्याकडून प्राप्त सुचनांच्या अनुषंगाने काही सुधारणा करणे आवश्यक असल्याने तसेच, यापुर्वी याअनुषंगाने निर्गमित करण्यात आलेले विविध शासन निर्णय/परिपत्रक अस्तिवात असल्याने कामकाज वाटपाच्या अनुषंगाने संभ्रम निर्माण झाल्याचे दिसून आले आहे.

सदर संभ्रम दुर करण्याच्या अनुषंगाने प्रस्तुत शासन निर्णय निर्गमित झाल्याच्या दिनांकापासून जिल्हाधिकारी व अपर जिल्हाधिकारी यांच्यातील कामकाज वाटपाबाबतचे संदर्भाधिन क्र. १ ते ५ व अनु. क्र. ७ येथील (दिनांक ०३.०७.२०२६ रोजी निर्गमित करण्यात आलेल्या शासन निर्णयासह यापुर्वी निर्गमित आलेले सर्व शासन निर्णय/परिपत्रक अधिक्रमित करण्यात येऊन परिपुर्ण शासन निर्णय निर्गमित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

<u>**शासन निर्णय :-**</u>

राज्यातील जिल्हाधिकारी व अपर जिल्हाधिकारी यांच्यातील तसेच निवासी उपजिल्हाधिकारी व उपजिल्हाधिकारी (महसूल) यांचे मधील कामाचे खालीलप्रमाणे फेरवाटप करण्यात येत आहे.

## २. <u>जिल्हाधिकारी व अपर जिल्हाधिकारी यांचेतील कामकाजाचे वाटप पुढीलप्रमाणे आहेत:-</u>

| जिल्हाधिकारी यांचेकडे सुपूर्द करावयाचे विषय | अपर जिल्हाधिकारी यांचेकडे सुपूर्द करावयाचे विषय |
|---|---|
| १. जिल्ह्यांतील सर्व विभागांचे संनियंत्रण व पर्यवेक्षण<br>२. सर्व प्रकारचे जमिनींचे व्यवस्थापन<br>३. स्थानिक स्वराज्य संस्थाच्या निवडणूका<br>४. भूसंपादन<br>५. आस्थापनाविषयक बाबी<br>६. गौणखनिज विषयक कामकाज (प्रस्ताव जिल्हा खनिकर्म अधिकारी यांचेकडून थेट जिल्हाधिकारी यांना सादर करण्यात येतील.)<br>७. गृह शाखा व दंडाधिकारीय सर्व कामकाज<br>८. नोंदणी व मुद्रांक विभाग विषयक कामकाज | १. महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ व इतर अधिनियमाखालील अपिले, पुनरिक्षण<br>२. संपूर्ण जिल्हयातील कमाल जमीन धारणा, कुळ वहिवाट, आदिवासी जमीन विषयक बाबी, कुळ कायदा, भूसुधार विषयक इत्यांदीचे कामकाज<br>३. नागरी कमाल जमीन धारणा कायदा विषयक बाबी<br>४. ॲग्रीस्टॅक योजना<br>५. ग्रामपंचायती संदर्भातील सर्व विवाद विषयक कामकाज (उदा. सदस्य अपात्रता, अविश्वास ठरावविषयक बाबी) |

९. भूमी अभिलेख विभाग विषयक कामकाज
१०. भारत निवडणूक आयोग यांचेकडील निवडणूक विषयक कामकाज
११. जिल्हा नियोजन समिती व जिल्हा नियोजन समितीविषयक कामकाज
१२. दुर्बल घटकावरील अत्याचारांना प्रतिबंध करणे व त्यांचे पुनर्वसन करणे.
१३. जनगणना
१४. कृषिगणना व पशुगणना विषयक कामकाज
१५. रोजगार हमी योजना
१६. दुय्यम कार्यालयांची तपासणी, रचना व कार्यपध्दती व कर्मचारी प्रशिक्षण
१७. सरफेसी कायदा, २००२ व माता-पिता व ज्येष्ठ नागरिक यांचा निर्वाह व कल्याण अधिनियम, २००७ विषयक कामकाज
१८. वेठबिगारांचे पुनर्वसन
१९. निखात निधी अधिनियम
२०. सामाजिक अर्थसहाय्य योजना
२१. नैसगिक आपत्ती व मदत कार्य, शेतीपिकांच्या नुकसानविषयक बाबी
२२. सैनिक कल्याण व जिल्हा सैनिक मंडळ
२३. शासकीय निवासस्थानांचे वाटप
२४. नगर पालिका प्रशासन
२५. दारुबंदी व उत्पादन शुल्कविषयक बाबी
२६. राजशिष्टाचार, अति महत्त्वाच्या व्यक्तींचे दौरे
२७. खरेदी सारख्या वित्तीय बाबी जिथे विभागप्रमुख म्हणून जिल्हाधिकाऱ्यांनी अधिकाराचा वापर करावयाचा आहे
२८. पतपुरवठा नियोजन आणि त्यासंबंधी इतर बाबी
२९. टंचाई व अनुषंगिक बाबी
३०. आरोग्यविषयक कार्यक्रम
३१. औद्योगिक विकास व जिल्हा उद्योग केंद्र विषयक बाबी
३२. जिल्हा पातळीवरील सर्वसाधारण समन्वय आणि समिती बैठका
३३. लोकशाही दिन, भ्रष्टाचार निर्मूलन समितीचे कामकाज व तक्रार निवारण
३४. शेतकरी आत्महत्या विषयक बाबी
३५. विविध सांविधानिक केंद्र व राज्य आयोगांकडील तक्रारींचे निवारण व पूर्तता अहवाल सादर करणे
३६. केंद्र व राज्य शासन व विभागीय आयुक्त सोपवतील असे या यादीमध्ये समाविष्ट नसलेले विषय/कोणतेही अन्य विषय

६. शासनाच्या जमीन सुधारणा योजना/धोरणांची प्रभावी अंमलबजावणी
७. अल्पबचत
८. अन्न व नागरी पुरवठा विषयक बाबी
९. करमणूक कर
१०. सर्व प्रकारची शासकीय वसूली
११. गावठाण विस्तार योजना
१२. महाराजस्व अभियान
१३. स्वांतत्र्य सैनिक बाबत विविध प्रकरणे
१४. पिक अंदाज सर्वेक्षण व पिकाचे पुर्वानुमान पैसेवारी व कृषिगणना
१५. निर्वासित संपत्ती अधिनियम
१६. कार्यक्रम अंदाजपत्रक व लेखा परिक्षण
१७. वक्फ बोर्ड अधिनियम खालील प्रकरणे
१८. प्रकल्पबाधितांचे पूनर्वसन व पुरग्रस्तांचे पुनर्वसन
१९. भाडे नियंत्रण कायद्याविषयक कामकाज
२०. विनिर्दिष्ट सहकारी संस्थाविषयक बाबी
२१. शासकीय मुद्रणालयाकडून निरनिराळे नमुने, लेखनसामग्री, छापील साहित्य इत्यादीचा पुरवठा
२२. शासन, विभागीय आयुक्त व जिल्हाधिकारी सोपवतील असे कोणतेही अन्य विषय.

उपरोक्त तक्त्यामध्ये अपर जिल्हाधिकारी यांच्या अधिनस्त काही विषय दर्शविले असले तरी, जिल्हाधिकारी यांनी जिल्हा प्रशासनाचे व जिल्हा महसूल विभागाचे प्रमुख या नात्याने त्या विषयांचादेखील वेळोवेळी आढावा घ्यावा. तसेच, आवश्यकतेनुसार जिल्हाधिकारी त्या विषयांबाबतही निर्देश देऊ शकतील व असे निर्देश अपर जिल्हाधिकारी तसेच जिल्ह्यातील सर्व संबंधित अधिकाऱ्यांवर बंधनकारक असतील.

३. राज्यातील काही जिल्हयांमध्ये उप जिल्हाधिकारी (महसूल) तर, काही जिल्हयांमध्ये उप जिल्हाधिकारी (सामान्य/सामान्य प्रशासन) अशी पदनामे अस्तित्वात आहेत. तरी, यापुढे राज्यात केवळ उप जिल्हाधिकारी (महसूल) असे पदनाम अस्तित्वात राहील.

त्यानुसार, **निवासी उपजिल्हाधिकारी व उपजिल्हाधिकारी (महसूल) यांचेतील कामकाजाचे वाटप पुढीलप्रमाणे राहील:-**

| **निवासी उपजिल्हाधिकारी यांचेकडे सुपूर्द करावयाचे विषय** | **उपजिल्हाधिकारी (महसूल) यांचेकडे सुपूर्द करावयाचे विषय** |
|---|---|
| १. आस्थापनाविषयक कामकाज<br>२. गृह/दंडाधिकारीय कामकाज (कायदा व सुव्यवस्था)<br>३. शस्त्र परवाना, सिनेगृह व व्हिडीओ गृह परवाना<br>४. सर्व प्रकारची शासकीय वसूली, आर.आर.सी. वसुली व तद्नुषंगीक कामकाज<br>५. टंचाई, पिक सर्वेक्षण, पिक विमा, पाणी आरक्षण, पिक पैसेवारी व अनुषंगिक बाबी.<br>६. नैसर्गिक आपत्ती व मदत वाटप<br>७. पिक कर्ज, कर्ज माफी व अनुषंगीक बाबी.<br>८. राजशिष्टाचार व राष्ट्रीय कार्यक्रम<br>९. सेतू विषयक कामकाज<br>१०. सामान्य प्रशासन व ई-ऑफिस<br>११. आपत्ती व्यवस्थापन कायदा २००५ बाबत कामकाज<br>१२. ऑनलाईन तक्रार निवारण (आपले सरकार, पी.जी. पोर्टल)<br>१३. जनगणना<br>१४. सैनिक कल्याण<br>१५. दिवाणी संहिता, BNSS अंतर्गत कामकाज<br>१६. औद्योगिक विकास व गुंतवणूक समन्वय<br>१७. सामाजिक अर्थसहाय्य योजना<br>१८. लेखा/हिशोब/लेखा परिक्षण/महालेखाकार, मुंबई व नागपूर बाबत कामकाज<br>१९. कार्यालयीन तपासणी व लेखा परिच्छेद अनुपालन<br>२०. कार्यक्रम अंदाजपत्रक | १. महसूल शाखा (शहरी व ग्रामीण भागातील सरकारी जमीनींचे व्यवस्थापन)<br>२. भोगवटदार वर्ग- २ जमीनी वर्ग-१ करणे व विक्री परवानगी<br>३. विकास परवानगी, सीटीएस जमिनीबाबतची प्रकरणे<br>४. महाराजस्व अभियान<br>५. आदिवासी जमीन, भुदान जमिनी, कुळ जमिनी, नझूल जमिनी, सिलींग जमिनी, इनाम जमिनी व्यवस्थापन, झुडपी जंगल जमीन/वन जमिनीविषयक कामकाज व तद्नुषंगिक बाबी<br>६. गावठाण विस्तार योजना<br>७. वन, वनहक्क व पेसा कायद्याची अंमलबजावणीविषयक कामकाज<br>८. कृषी गणना, ॲग्रिस्टॅक<br>९. राष्ट्रीय भुमी अभिलेख आधुनिकीकरण कार्यक्रम ( NLRMP)<br>१०. स्थानिक स्वराज्य संस्था निवडणूका<br>११. करमणूक कर<br>१२. शासन, विभागीय आयुक्त व जिल्हाधिकारी सोपवतील असे अन्य कामकाज. |

| | |
|---|---|
| २१. जिल्हास्तरीय बैठकांचे आयोजन (लोकशाही दिन/भ्रष्टाचार निर्मूलन समिती बैठक व तद्नुषगिंक बाबी<br>२२. राज्यस्तरीय व जिल्हास्तरीय समितीविषयक कामकाज<br>२३. महसूल अधिकारी यांची बैठक<br>२४. टपालाचे आवक-जावक व सामान्य शाखा<br>२५. शेतकरी आत्महत्याविषयक बाबी व मदत वाटप<br>२६. शासन, विभागीय आयुक्त व जिल्हाधिकारी सोपवतील असे अन्य कामकाज | |

४. उपरोक्त कामकाज वाटपामध्ये क्षेत्रीय स्तरावर कोणत्याही प्रकारचा बदल करण्यात येऊ नये किंवा तशी आवश्यकता असल्यास शासनाची पूर्वपरवानगी घेणे आवश्यक राहील.

५. सदर शासन आदेश महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संगणक संकेतांक क्रमांक २०२६०७३११६४३०३००४८ असा आहे. हे शासन आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

MAHESH ASHOKRAO VARUDKAR

Digitally signed by MAHESH ASHOKRAO VARUDKAR
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=REVENUE AND FORESTS DEPARTMENT, 2.5.4.20=D93C4961D98086877A4048296211D7AF97ECFD40D7967C43D20B360D83CE0FA6, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=7EBBBC3712E8D459EF90BF7AAE4EA46E9CAEBDD50CFECDE2EE7CE0454FA0416A, cn=MAHESH ASHOKRAO VARUDKAR
Date: 2026.07.31 16:57:31 +05'30'

**(महेश वरुडकर)**
**शासनाचे उप सचिव**

प्रत,

१. मा.मुख्यमंत्री महोदयांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई
२. मा.उप मुख्यमंत्री (नगरविकास/गृहनिर्माण) महोदयांचे सचिव, मंत्रालय, मुंबई
३. मा.उप मुख्यमंत्री (रा.उ.शु., क्रीडा व अल्पसंख्यांक विकास) महोदयांचे सचिव, मंत्रालय, मुंबई
४. मा. मंत्री (महसूल) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
५. मा. राज्यमंत्री (महसूल) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
६. मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन यांचे उप सचिव, मंत्रालय, मुंबई
७. सर्व विभागीय आयुक्त.
८. सर्व जिल्हाधिकारी.
९. सर्व अपर जिल्हाधिकारी/निवडश्रेणी अपर जिल्हाधिकारी
१०. सर्व निवासी उपजिल्हाधिकारी/ उपजिल्हाधिकारी (महसूल).
११. अपर मुख्य सचिव (महसूल) यांचे विशेष कार्य अधिकारी, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई
१२. प्रधान महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र-१/२ मुंबई /नागपूर.
१३. अधिदान व लेखा अधिकारी/निवासी लेखा अधिकारी, मुंबई
१४. सर्व जिल्हा कोषागार अधिकारी
१५. संचालक व लेखा कोषागरे, मुंबई.
१६. निवडनस्ती (कार्यासन आस्था-०१), महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई.